सकाळ

# रवळनाथला उपकंपनी स्थापण्यास मान्यता

## संस्थापक अध्यक्ष चौगुले : केंद्रीय निबंधकांची मंजुरी

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ३ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला उपकंपनी स्थापन करण्यास सहकार खात्याच्या केंद्रीय निबंधकांनी मान्यता दिली आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

संस्थेच्या २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपकंपनी स्थापन करण्यास सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली होती. त्यास अनुसरून केंद्रीय निबंधकांकडे संस्थेची उपकंपनी स्थापन करण्याच्या परवानगीचा प्रस्ताव दिला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे. या मान्यतेमुळे हिरण्यकेशी रुरल डेव्हलपमेंट प्रा. लि. या नावाने कंपनीची स्थापना करण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. संपूर्ण महाराष्ट्र



एम. एल. चौगुले

व कर्नाटकातील बेळगाव, धारवाड जिल्हा असे संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. यामुळे संस्थेच्या या कार्यक्षेत्रातील आजारी कृषिपूरक संस्थांमध्ये गुंतवणूक करणे किंवा त्या सहयोग, भाडे, बीओटी तत्त्वावर चालवायला घेणे शक्य होणार आहे. साखर कारखाने, दूध, सूतगिरणी, काजू प्रक्रिया आदी संस्थांचा यात समावेश होतो. यामुळे हजारो शेतकरी, कष्टकऱ्यांच्या योगदानातून उभारलेल्या अशा संस्थांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी मदत करणे शक्य झाले आहे, असेही चौगुले यांनी सांगितले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव व संचालक उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/06/2022 Page No. 2

तरुण भारत शनिवार ४ जून २०२२

# रवळनाथला उपकंपनी स्थापन करण्यास केंद्रीय निबंधकांची मान्यता

- संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची माहिती
- शेतकरी, लघू-मध्यम व्यापाऱ्यांचा फायदा होणार

प्रतिनिधी
गडहिंग्लज

श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीला उपकंपनी स्थापन करण्यास केंद्रीय सहकार खात्याच्या निबंधकानी मान्यता दिल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



रवळनाथ च्या २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधरण सभेत संस्थेची उपकंपनी स्थापन करण्याची सभासदांनी मान्यता दिली होती. त्यानुसार केंद्रीय सहाकार खात्याकडे परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला होता. त्याला मंजुरी मिळाली असून 'हिरण्यकेशी रूरल डेव्हलपमेंट प्रा. लि' या नावाने कंपनीची स्थापना करण्याचा संचालकांनी घेतला आहे. यामुळे संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कृषीपुरक संस्थामध्ये गुंतवणूक, मदत, बीओटी तत्वावर चालवायला घेणे शक्य होणार आहे. यासोबत कार्यक्षेत्रातील साखर कारखाने, दूध प्रक्रिया संस्था, सूतगिरणी, काजू प्रक्रिया संस्थांना देखील आर्थिक पाठबळ किंवा बीओटी तत्वावर चालवणे शक्य होणार आहे. यामुळे कार्यक्षेत्रातील शेतकरी, लघू-मध्यम व्यापाऱ्यांचा फायदा होणार असून कष्टकऱ्यांच्या योगदानातून उभारलेल्या संस्थांना उर्जितावस्था आणण्यासाठी मदत करणे सोपे होणार असल्याचे चौगुले यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह अन्य उपस्थित होते.

पुढारी

# 'रवळनाथ'ला उपकंपनी स्थापन करण्यास केंद्रीय निबंधकांची मान्यता

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



एम. एल. चौगुले

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला 'उपकंपनी' स्थापन करण्यास सहकार खात्याच्या केंद्रीय निबंधकांनी मान्यता दिली आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेची उपकंपनी स्थापन करण्यास सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली होती. त्यास अनुसरून केंद्रीय निबंधक यांच्याकडे संस्थेची उपकंपनी स्थापन करण्यास परवानगी मिळण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार 'हिरण्यकेशी रूरल डेव्हलपमेंट प्रा. लि.' या नावाने कंपनीची स्थापना करण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे.

सध्या संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकातील बेळगाव, धारवाड जिल्हा असे संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. यामुळे संस्थेच्या या कार्यक्षेत्रातील आजारी कृषिपूरक संस्थांमध्ये गुंतवणूक करणे किंवा त्या सहयोग, भाडे, बीओटी तत्त्वावर चालवायला घेणे शक्य होणार आहे. (उदा. साखर कारखाने, दूध, सूतगिरणी, काजू-प्रक्रिया, संस्था इ.) यामुळे हजारो शेतकरी, कष्टकऱ्यांच्या योगदानातून उभारलेल्या अशा संस्थांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी मदत करणे शक्य झाले आहे, असे चौगुले यांनी स्पष्ट केले. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# रवळनाथला उपकंपनी स्थापन करण्यास मान्यता

**गडहिंग्लज :** येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला उपकंपनी स्थापन करण्यास सहकार खात्याच्या केंद्रीय निबंधकांनी मान्यता दिल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेची उपकंपनी स्थापन करण्यास सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली होती. त्यास अनुसरून केंद्रीय निबंधक यांच्याकडे दिलेल्या प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार हिरण्यकेशी रुरल डेव्हलपमेंट प्रा. लि. या नावाने कंपनीची स्थापना करण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकातील बेळगाव, धारवाड जिल्हा असे संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. यावेळी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, डी. के. मायदेव उपस्थित होते.

